# ॥शिवराज्याभिषेक सोहळा॥

सन्मानपत्र

प्रति, मा. श्री. रा. रा. **सन्माननीय कोरोना योद्धा** यांना

शिवछत्रपती अखंड देशवासीयांचे स्फूर्तीस्थान, रयतेचे पालनकर्ते, संरक्षक कवच अन मावळ्यांचे मन व मनगट मजबूत करणारे पराक्रमी राजे साडे तीनशे वर्षानंतरही त्यांच्या विचारांचा जागर जगभर सुरू आहे. लष्कर, कृषी, पर्यावरण, अर्थकारण अशा विविध क्षेत्रात त्यांचे विचार प्रेरक आहेत. ''प्रजाहितदक्ष'' हा त्यांचा गुण आजही काळावर अधिराज्य गाजवतो. रयतेची काळजी घेण्यात कसूर न करणारे ''लोककल्याणकारी, रणधुरंधर, क्षत्रिय कुलावतंस महापराक्रमी महाराज''

कोरोनाच्या संकट प्रलयाने देशवासीय भयभीत झाले आहेत. नागरिकांच्या मनातील भीती कमी करण्यासाठी अनेकजण झटत आहेत. लाखो हात दिवस-रात्र कोरोनाबाधित रूग्णांच्या सेवेत आहेत. प्रत्येकाची काळजी घेत जीव वाचविण्याची धडपड सुरू आहे.

शिवछत्रपतींच्या प्रजाहितदक्षतेची प्रचिती पुन्हा येत आहे. त्यांच्या विचारांचे वारसदार बनून कोरोनाचे आक्रमण परतवून लावण्यासाठी जीवाची बाजी लावून योद्धयाप्रमाणे आपण कार्यरत आहात. तुमच्या कार्याचा आम्हाला अभिमान आहे.

या उल्लेखनीय कार्यासाठी शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त ६ जून २०२० रोजी दुर्गराज रायगडावर आपला ''कोरोना योद्धा'' सन्मानपत्र देऊन गौरव करताना आम्हास अभिमान वाटत आहे.

संभाजी छत्रपती

**छत्रपती संभाजीराजे**

युवराज संभाजीराजे छत्रपती

**अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, दुर्गराज रायगड**

*Sambhaji Shahu Chhatrapati*
Member of Parliament
(Rajya Sabha)

सत्यमेव जयते

दि.– ०६ जून २०२०

## शतशः सलाम

कोरोना संकटाच्या या कठीण काळात आपल्या कुटुंबची किंवा आपल्या जीवाची परवा ना करता देश सेवेसाठी झोकून देत कोरोना योध्दा म्हणून अविरतपणे सेवा बजावत आहेत. त्यांची ही सेवा उल्लेखनीय ठरत आहे. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त श्रीमंत युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते या सर्व योद्ध्यांना दुर्गराज रायगड येथील राजसदरेवरून 'कोरोना योध्दा' सन्मानपत्र समर्पित करण्यात आले.

सोबतचे "कोरोना योद्धा सन्मानपत्र" आपल्या सर्व कोरोना योद्धा सहकाऱ्यांच्या पर्यंत पोहोचावे, ही अपेक्षा.

**"शिवाजी महाराज मनामनात, शिवराज्याभिषेक घराघरात"**

आपला

संभाजी छत्रपती

**छत्रपती संभाजीराजे**

New Palace, Kolhapur 416 003, Maharashtra
Tel: (O) 0231-2669945, 011-23384564 Cell: 9013181308, 9850508671, 9922414130
Email: sambhaji.chhatrapati@sansad.nic.in, sambhajichhatrapati@rediffmail.com